# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २९/०६/२०२४ (शनिवार) दुपार

---

## अवैधरीत्या गावठी मोहाफुल दारुची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक २८/०६/२०२४ रोजी पोस्टे खापा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत प्रोव्हीशन रेड पेट्रोलींग करीत असता मुखबीरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, एक इसम मोटरसायकलवर अवैधरीत्या गावठी मोहाफुल दारूची वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून स्टाफने मौजा वाघोली ते चिचोली कच्चा रोडवर नाकाबंदी केली असता एक होन्डा एस.पी १२५ मो.सा क्र. एम. एच– ४०/सी.एल ६१२६ चा चालक **आरोपी नामे–१) अमोल ईश्वर मरस्कोल्हे, वय २७ वर्ष रा. बनेरा पो.स्टे नवेगाव खैरी ता. पारशिवणी** याने **आरोपी क्र. २) एकनाथ संतोष भलावी वय ५२ वर्ष, रा. बनेरा पो.स्ट नवेगाव खैरी ता. पारविशवणी** यांचे सांगणेवरून आपल्या ताब्यातील एक होन्डा एस.पी १२५ मो.सा क्र. एम. एच– ४०/सी.एल ६१२६ वरील बॅगची पाहणी केली असता एका बॅगमध्ये काळया रंगाच्या रबरी टयुबमध्ये २० लीटर मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू किंमती १०००/– रू चा मुद्देमाल अवैद्यरीत्या विनापरवाना वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीकडुन असा एकुण वाहनासह ५१०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूद्ध कलम ६५ (अ), ८३ म.दा.का. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापा येथील ठाणेदार सपोनि सुनिल दहीभाते, पोहवा खोमेश्वर बांबल, पोना संतोष परतेती यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर